Scholarly Research Journal for Humanity Science & English Language
Online ISSN 2348-3083, SJ IMPACT FACTOR 2024: 8.058
https://www.srjis.com/issues_data/226
PEER REVIEWED, REFEREED & INDEXED JOURNAL DEC-JAN 2024, Vol-12/61
https://doi.org/10.5281/zenodo.10784788

उच्च प्राथमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या आरोग्य समस्यांचा व्यवस्थापनासाठी उद्बोधन कार्यक्रमाची अमंलबजावणी व परिणामकारकता

श्री. उत्तम महादू पाटोळे [1] & डॉ. संध्या मिलिंद खेडेकर [2], Ph.D.
1. संशोधक विद्यार्थी,
2. संशोधक मार्गदर्शक.
संशोधन केंद्र:- *विद्या प्रतिष्ठाण (महाराष्ट्र) संचलित, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, पद्व्युत्तर शिक्षणशास्त्र महाविद्यालय आणि संशोधन केंद्र, केडगाव, अहमदनगर.*

Paper Received On: 12 December 2023
Peer Reviewed On: 28 January 2024
Published On: 01 February 2024

Abstract

प्रस्तुत संशोधन अभ्यासामध्ये अहमदनगर जिह्यातील उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या सद्यस्थितीतील आरोग्य साक्षरता जाणीव जागृतीचा अभ्यास करण्यात आला आहे. संशोधनाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी संशोधकाने विद्यार्थ्यांना स्वनिर्मित पंचबिंदू आरोग्य अभिवृत्ती मापिका दिली. सदर अभिवृत्ती मापिकेमध्ये शारीरिक आरोग्यावर आधारित 40 प्रश्न, मानसिक आरोग्यावर आधारित 20 प्रश्न, सामाजिक-नैतिक आरोग्यावर आधारित 20 प्रश्नांचा समावेश केला. सदर चाचणीची सप्रमाणता, विश्वसनियता, वस्तुनिष्ठता, पर्याप्तता, उपयुक्तता व भेदभाव क्षमता संशोधकाने तज्ज्ञांच्या मदतीने तपासली. पथदर्शी अभ्यासाच्या साहाय्याने संशोधकाने अभिवृत्ती मापिकेमधील उणिवा दूर केल्या.

संशोधकाने शहरी भागातील एक व ग्रामीण भागातील एक उच्च प्राथमिक विद्यालयामध्ये समान गट संशोधनाच्या एकल गट पूर्व-उत्तर चाचणी अभिकल्पाची निवड केली. एक गट निवडून त्या गटास पूर्व चाचणी दिली. नंतर प्रायोगिक पद्धतीने 70 दिवस उद्बोधन कार्यक्रम अंमलबजावणी केली व शेवटी उत्तर चाचणी दिली. संशोधकाने, प्रस्तुत संशोधनासाठी उद्बोधन कार्यक्रम निर्मिती या स्वाश्रयी चलाची व विद्यार्थी आरोग्य साक्षरता व्यवस्थापन संपादणूक या आश्रयी चलाची निश्चिती केली आहे. संशोधकाने माहिती विश्लेषणासाठी शेकडेवारी, मध्यमान, प्रमाण विचलन व t-test या संख्याशास्त्रीय साधनांचा वापर करुण निष्कर्ष काढला असता विद्यार्थ्यांच्या आरोग्य व्यवस्थापनासाठीचा उद्बोधन कार्यकम परिणामकारक आढळला.

Copyright@2024 Scholarly Research Journal for Humanity Science & English Language

प्रस्तावना :–

भारतीय संस्कृतीला महान ऋषिमुनींनी आगाध असे ज्ञान भांडार दिले आहे. जो पर्यंत मानव त्या परंपरेचे पालन करत होता तो पर्यंत त्याला उत्तम आरोग्याची देण मिळत होती. आज मात्र मनुष्य हा अत्यंत यांत्रिक झाला आहे. त्याला स्वत:कडे पुरेसे लक्ष देण्यासाठी फुरसत नाही. किंबहुना तो हव्यासापोटी दररोज धावतच आहे. या सर्वांचा प्रतिकूल परिणाम त्याच्या आरोग्यावर झाला आहे. कोणताही रोगी व्यक्ती जीवनाचा आनंद घेऊ शकत नाही. आनंदी जीवन जगण्यासाठी त्यास उत्तम आरोग्य असणे अत्यंत गरजेचे आहे.

भारतामध्ये विद्यार्थ्यामध्ये शारीरिक आरोग्याच्या प्रामुख्याने समस्या दृष्टीविषयक, श्रवणदोष, त्वचारोग, दंतविकार, मुखविषयक, आहारविषयक, भेसळयुक्त अन्न, पोषणयुक्त अन्नघटक अभाव, शारिरीक पोषण विषयक, दूषित अन्न–पाणी–हवा, ध्वनी व अन्य प्रदूषण विषयक, जीवनसत्वे माहितीचा अभाव विषयक, सूक्ष्मजीव / प्राणी आजार माहितीचा अभाव, लैंगिक समस्या विषयक, सौंदर्य प्रसादने वापराविषयक, योग विषयक योग्य माहितीचा अभाव, आरोग्य विषयक जागृतीचा अभाव, प्रथमोपचार विषयक माहितीचा अभाव, पित्त व वात विषयक विकार, पर्यावरण विषयक समस्या माहितीचा अभाव, प्लॅस्टिक वापारामुळे आरोग्य समस्या, डोक्यांच्या केस विषय समस्या जाणवतात.

भारतामध्ये विद्यार्थ्यामध्ये मानसिक आरोग्याच्या प्रामुख्याने समस्या मानसिक आरोग्य माहितीचा अभाव, ताण तणाव, चिंता, फोबिया, इर्षा, अंधश्रद्धा, रोड हिप्नोटिस विषयक माहितीचा अभाव, अभ्यासात मन न लागणे, विस्मरण, दंगाप्रवृत्ती व आडदांड वृत्ती, मोबाईल आसक्ती विषयक समस्या जाणवतात.

भारतामध्ये विद्यार्थ्यामध्ये सामाजिक व नैतिक आरोग्याच्या प्रामुख्याने समस्या सामाजिक विकास अभाव, सामाजिक बांधिलकी अभाव, सामाजिक विषमता, नेतृत्वगुण, खिलाडू वृत्तीचा अभाव, श्रमप्रतिष्ठा विषयक अज्ञान, स्त्री – पुरुष समानता, उत्तरदायित्व विषयक समस्या, परोपकारी वृत्तीचा अभाव, गाभा घटक परिपोषाचा अभाव इत्यादी समस्या जाणवतात.

बऱ्याचदा असे घडते की, जेव्हा मनुष्याला आरोग्याच्या समस्या जाणवायला लागतात, तेव्हा तो त्याकडे लक्ष देतो. मार्गदर्शन मिळेपर्यंत व उपचार घेणेपर्यंत आरोग्य समस्या चांगलीच गंभीर बनलेली असते. हे टाळण्यासाठी प्रत्येकाला आरोग्य समस्याचे ज्ञान असल्यास, सामान्य लक्षणे आढळल्यास त्वरीत त्यावर उपचार केल्यास व्यक्तीला निश्चितच फायदा होईल.

Copyright@2024 Scholarly Research Journal for Humanity Science & English Language

थोडक्यात, उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थी आरोग्य साक्षर झाल्यास चांगले आरोग्य संपन्न भारत निर्माण होईल. म्हणून प्रस्तुत संशोधन कार्य संशोधकाने हाती घेतले आहे.

संशोधनाची गरज:-

आजच्या धकाधकीच्या युगात आरोग्य विषयक कोणतीच समस्या नसलेला व्यक्ती सापडणे विरळाच. प्रत्येक व्यक्ती कोणत्याना कोणत्या समस्येने ग्रस्त आहे. त्याचे शारीरिक, मानसिक, भावनिक किंवा सामाजिकस्वास्थ बिघाडलेले असू शकते. या सर्व आरोग्यविषयक समस्येचे मूळ हे आरोग्यविषयक अज्ञान, जीवन जगण्याच्या चुकीच्या सवयी किंवा आरोग्या विषयी अनस्था हेच आहे.

कित्येकांना बालवयात तर काहींना प्रौढपणी विविध आरोग्याच्या समस्यांना सामोरे जावे लागते. वयोपरत्वे काही आजार असतील, मात्र आजच्या काळात अत्यंम कमी वयात सुद्धा विद्यार्थी आजारांना बळी पडल्याचे आढळते. या मध्ये विशेष करुन दृष्टिदोष, श्रवणदोष / कर्णबधिरता, केसांच्या समस्या, पचनसंस्थेचे विकार, स्थूलपणा, त्वचारोग, दंत रोग, तोंडाचे विकार, श्वसनाचे विकार, कुपोषण, ताणतणाव, विस्मरण, अस्पष्ट उच्चार वा वाचादोष, हृदयरोग, मूत्राशय / किडणीचा त्रास यांचा समावेश होतो. हे टाळण्यासाठी विद्यार्थ्यांना विद्यार्थी दशेतच सुदृढ आरोग्याचे महत्व समजणे आवश्यक आहे. यासाठी त्याला चांगल्या आरोग्याची जाण निर्माण होणे गरजेचे आहे. त्याच्या अंगी बालवयातच आरोग्यविषयी चांगल्या सवयी रुजल्या तर त्याचे मन प्रसन्न राहिल, तो आजारपणापासून दूर राहिल. तसेच प्रत्येक कामाध्ये त्याचा तुलनात्मक उत्साह अधिक असल्याने त्याची सर्वांगिण प्रगती होईल यात शंकाच नाही.

यासाठी विद्यार्थ्यांना विद्यार्थीदशेतच आरोग्य साक्षरतेचे ज्ञान मिळणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच या पूर्वी आरोग्य साक्षरता या विषयावर उच्चप्राथमिक विद्यालयांच्या संदर्भात संशोधन झाल्याचे आढळले नसल्याने सदर संशोधनाची गरज भासते आहे.

संशोधनाचे महत्व:-

उच्च प्राथमिक स्तरावरच्या विद्यार्थ्यांना आरोग्य विषयक अधिक मार्गदर्शनाची आवश्यकता आहे. बालवयानंतर बालके कौमार्य अवस्थेत अवस्थांतरित होत असतात. त्यांच्यात शारिरीक बदल होत असतात. त्यांच्या सवयी बदलत असतात. उत्तम आरोग्याचे महत्व त्यांना कळतेच असे नाही. जेव्हा आरोग्याचे महत्व कळते तेव्हा वेळ निघून गेलेली असते. त्यामुळे सदर संशोधनाचे महत्व अधिक आहे. या स्तरावरील विद्यार्थी मानसशास्त्रज्ञांच्या मते अधिक जागृत असतो. सर्वसाधरणतः

Copyright@2024 Scholarly Research Journal for Humanity Science & English Language

विद्यार्थी माता व पिता यांच्या पेक्षा आपल्या शिक्षकांचे अधिक अनुकरण करत असतो. त्यांच्या सुचनांचे पालन करत असतो. शिक्षकाने त्यास जर होणारे आजार व त्या मागची कारणे विषद केली तर नक्कीच तो या कडे लक्ष देईल व आपल्या आरोग्याची अधिक काळजी घेईल.

म्हणून विद्यार्थ्याला उच्च प्राथमिक स्तरावरच, कौमार्यअवस्थेमध्ये आरोग्य साक्षरतेचे महत्व जर कळले तर ते अधिक उपयुक्त व फायदेशिर ठरेल व निरोगी भारत घडण्यास मदत होईल. शालेय स्तरावरच विद्यार्थ्यांना आरोग्याच्या चांगल्या सवयी समजल्या व अनिष्ट गोष्टींची माहिती मिळाली तर त्यांच्या मध्ये आमुलाग्र बदल झाल्या शिवाय राहणार नाही. या साठी प्रस्तूत संशोधन अत्यंत महत्वाचे आहे.

संशोधन समस्या विधान:-

"अहमदनगर जिल्ह्यातील उच्च प्राथमिक स्तरावरील इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांना आरोग्य साक्षरता व्यवस्थापनासाठी कार्यक्रम निर्मिती व परिणामकारकतेचा अभ्यास करणे."

संशोधन कार्यात्मक व्याख्या:-

संकल्पनात्मक व्याख्या-

1) **अहमदनगर जिल्हा-**
   महाराष्ट्र राज्यामध्ये प्रशासकीय सोयीसाठी राज्यांचे क्षेत्रफळानुसार विभागलेल्या 36 विभागापैकी एक विभाग म्हणजे अहमदनगर जिल्हा होय
2) **उच्च प्राथमिक स्तर-**
   1986 च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या 5+3+2 या आकृतीबंधानुसार इयत्ता आठवीचा वर्ग.
3) **इयत्ता-**1986 च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या 5+3+2 या आकृतीबंधानुसार 14 वर्ष वयोगटाचा विद्यार्थी ज्या वर्गात शिक्षण घेतो त्या वर्गास इयत्ता असे म्हणतात.
4) **विद्यार्थी-**अहमदनगर जिल्ह्यामधील ग्रामीण व शहरी भागातील उच्च प्राथमिक विद्यालयामध्ये प्रवेश घेणारे मुले व मुली यांना विद्यार्थी असे म्हणतात.
5) **आरोग्य साक्षरता-**शारीरिक, मानसिक, सामाजिक दृष्टिने व्यवस्थित आणि रोगमुक्त असण्याची अवस्था व आरोग्य विषयक जाणिव जागृती होणे म्हणजे आरोग्य साक्षरता होय.
6) **व्यवस्थापन-**विद्यार्थ्यांना आरोग्य साक्षर करण्यासाठी निर्माण केलेला कार्यक्रम म्हणजे व्यवस्थापन होय.

Copyright@2024 Scholarly Research Journal for Humanity Science & English Language

7) **कार्यक्रम निर्मिती** –नव्या गोष्टीबद्दल ज्ञान देणे आणि जागृती करणे यासाठी जो कार्यक्रम निर्माण केला जातो त्याला कार्यक्रम निर्मिती म्हणतात.
8) **परिणामकारकता**–संशोधकाने कार्यक्रम राबविण्यापूर्वीच्या पूर्व चाचणीतील गुणांची पातळी व कार्यक्रम राबविल्यानंतरच्या उत्तर चाचणीतील गुणांची पातळी यांचा संख्याशास्त्रीय फरक म्हणजे परिणामकारकता होय.
9) **अभ्यास**–एखाद्या विषयाचे निरीक्षण करुण अर्थनिर्वचन करणे म्हणजे अभ्यास होय.

कार्यात्मक व्याख्या–

1) **कार्यक्रम निर्मिती**–उच्च प्राथमिक स्तरावरील इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांना आरोग्य साक्षर करण्यासाठी आरोग्याचे घटक, चांगल्या आरोग्यासाठीचे घटक, आरोग्यावर प्रतिकूल परिणाम करणारे घटक इत्यादी घटकांवर आधारित कार्यक्रम. शारिरीक तपासणी करण्यासाठी आरोग्य शिबीराचे आयोजन, सामाजिक व मानसिक आरोग्यासाठी विशेष मार्गदर्शन वर्गांचे आयोजन, विद्यार्थ्यांना आरोग्याविषयी अधिक जाणीव जागृती करण्यासाठी ICT व e-learning आधारित कार्यक्रम म्हणजे कार्यक्रम निर्मिती होय.
2) **उच्च प्राथमिक स्तर**:–इयत्ता आठवीचा वर्ग व त्या वर्गात अध्यापन करणारे विद्यार्थी म्हणजे उच्च प्राथमिक स्तर होय.
3) **अभ्यास**–पूर्व चाचणी –कृती कार्यक्रम – उत्तर चाचणी चे संख्याशास्त्रीय विश्लेषण करुण निरीक्षणाच्या आधारे निष्कर्ष काढणे म्हणजे अभ्यास होय.

संशोधनाची उद्दिष्टे:–

1) उद्बोधन कार्यक्रम अमंलबजावणी करणे व त्याची परिणामकारकता तपासणे.
2) उच्च प्राथमिक विद्यालयातील ग्रामीण भागातील विद्यार्थी व शहरी भागातील विद्यार्थी यांच्या आरोग्य समस्यांचा तुलनात्मक अभ्यास करणे.
3) उच्च प्राथमिक विद्यालयातील ग्रामीण व शहरी भागातील मुले आणि ग्रामीण व शहरी भागातील मुली यांच्या आरोग्य समस्यांचा तुलनात्मक अभ्यास करणे.

संबधित साहित्य व संशोधन आढावा:–

1) **अनुराधा सहस्त्रबुद्धे (1987)** यांनी, "INTEGRATION OF HEALTH AND ADULT EDUCATION FOR WOMEN WITH A FOCUS ON TRANING ON FUNCTIONARIES" या विषयावर केलेल्या संशोधनात प्रतिसादक जाणीव जागृती संख्या मध्यम स्वरुपात आढळली. प्रस्तुत संशोधनामध्ये आरोग्य समस्या जाणीव जागृती प्रमाण जास्त आढळले. म्हणजे सदर आरोग्य साक्षरता उद्बोधन कार्यक्रम जास्त परिणामकारक आहे.

Copyright@2024 Scholarly Research Journal for Humanity Science & English Language

2) **Antony Peter Jude (2012)** यांनी, "AWARENESS OF HEALTH AND PHYSICAL FITNESS, STATUS OP PHYSICAL FITNESS, AND ACADEMIC ACHIEVEMENT AMONG SCHOOL BOYS AND GIRLS." या विषयावर केलेल्या संशोधनामध्ये आरोग्य विषयक जाणीव जागृतीचे प्रमाण कमी प्रमाणात आढळले. प्रस्तुत संशोधनामध्ये आरोग्य समस्या जाणीव जागृती प्रमाण जास्त आढळले. म्हणजे सदर आरोग्य साक्षरता उद्बोधन कार्यक्रम अधिक परिणामकारक आहे.

3) **हिरगळ जयश्री पंढरीनाथ (2008)** यांनी, "माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या आहार सवयींचा अभ्यास" या विषयावर केलेल्या संशोधनामध्ये प्रतिसादकांच्या आहार सवयीमध्ये अल्प प्रमाणात बदल आढळला. प्रस्तुत संशोधनामध्ये विद्यार्थी आहार सवयी मध्ये अधिक बदल झाला.

उद्दिष्ट क्र. 1 ची कार्यपद्धती–

उद्दिष्ट क्र. 01: उद्बोधन कार्यक्रम अमंलबजावणी करणे व त्याची परिणामकारकता तपासणे.

सहेतूक नमुना निवड– प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधकाने सहेतूक नमुना निवड पद्धतीने प्रायोगिक पद्धतीसाठी शहरी भागातील व ग्रामीण भागातील एक शाळा व प्रत्येक शाळेतील 18 मुले व 18 मुलींची नमुना म्हणून निवड केली.

सारणी

अ.न.	**क्षेत्र**	**नमुना निवड**	**शाळा संख्या**	**विद्यार्थी संख्या**		
				मुली	मुले	एकूण संख्या
1	शहरी	सहेतुक	01	18	18	36
2	ग्रामीण	सहेतुक	01	18	18	36
3	एकूण–		02	36	36	72

संशोधन माहिती संकलन साधने–

प्रस्तुत संशोधनामध्ये उद्दिष्ट क्रमांक 1 च्या माहिती संकलनासाठी संशोधकाने कार्यक्रमाच्या परिणामकारकतेसाठी आरोग्य अभिवृत्ती मापिका या माहिती संकलन साधनाचा वापर केला.

संशोधन माहिती विश्लेषण संख्याशास्त्रीय साधने–

संशोधकाने उद्दिष्ट क्रमांक 1 च्या माहिती विश्लेषणासाठी शेकडेवारी, मध्यमान, प्रमाण विचलन व 5. t-test या संख्याशास्त्रीय साधनांचा वापर केला.

कोष्टक क्रमांक- 1 शहरी व ग्रामीण क्षेत्र विद्यार्थी (मुले-36 व मुली- 36) पूर्व व उत्तर अभिवृत्ती आरोग्य संपादणूक कसोटीतील प्राप्तांकांचा सांख्यिकिय तपशिल

अ.न.	चाचणी	नमुना (N)	मध्यमान (M)	प्रमाण विचलन (SD)	स्वाधीनता मात्रा (df)	t मूल्य	0.01 सार्थकता स्तरावर t मूल्य	प्राप्त t मूल्य सार्थक/असार्थक	शून्य परिकल्पना स्विकार / त्याग
1	पूर्व	72	46	6	71	24.35	2.65	सार्थक	त्याग
2	उत्तर	72	80	9					

निरीक्षणे:-

1. पूर्व चाचणीचे मध्यमान 46 व उत्तर चाचणीचे मध्यमान 79 इतके आले.
2. संख्याशास्त्रीय पद्धतीने t मूल्ये 24.35 इतके आले.
3. 0.01 सार्थकता स्तरावर df= 71 साठी कोष्टकावरुण t मूल्ये 2.65 इतके आहे.

0.01 सार्थकता स्तरावर परिकल्पना परीक्षण- स्वाधीनता मात्रा 71साठी टेबल D वरुन 0.01 सार्थकता स्तरावर मूल्य 2.65 आहे. प्राप्त t मूल्य 24.35 असून ते नमुना t मूल्यापेक्षा जास्त असल्यामुळे प्राप्त मूल्य हे सार्थक मानावे लागेल. त्यामुळे शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल व संशोधन परिकल्पनेचा स्विकार करावा लागेल.

अर्थनिर्वचन:-पूर्व चाचणी व उत्तर चाचणीच्या मध्यमानाच्या फरकाची सार्थकता तपासली असता प्राप्त t मूल्ये हे प्रमाणित t मूल्यापेक्षा जास्त आले आहे. त्यामुळे शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल व संशोधन परिकल्पनेचा स्विकार करावा लागेल.

याचाच अर्थ, उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना आरोग्य साक्षरता व्यवस्थापनासाठी निर्माण केलेला उद्बोधन कार्यक्रम परिणामकारक आहे.

उद्दिष्ट क्र. 2 ची कार्यपद्धती-

उद्दिष्ट क्र. 02:- उच्च प्राथमिक विद्यालयातील ग्रामीण भागातील विद्यार्थी व शहरी भागातील विद्यार्थी यांच्या आरोग्य समस्यांचा तुलनात्मक अभ्यास करणे.

कोष्टक क्रमांक- 2 ग्रामीण क्षेत्र विद्यार्थी व शहरी क्षेत्र विद्यार्थी यांच्या आरोग्य संपादणूक उत्तर चाचणी कसोटीतील प्राप्तांकाचा सांख्यिकिय तपशिल

अ. न.	चाचणी	नमुना (N)	मध्यमान (M)	प्रमाण विचलन (SD)	स्वाधीनता मात्रा (df)	t मूल्य	0.01 सार्थकता स्तरावर t मूल्य	प्राप्त t मूल्य सार्थक/ असार्थक	शून्य परिकल्पना स्विकार / त्याग
1	पूर्व	36	80	04	35	0.99	2.72	असार्थक	स्विकार
2	उत्तर	36	78	12					

निरीक्षणे:-

1. पूर्व चाचणीचे मध्यमान 80 व उत्तर चाचणीचे मध्यमान 78 इतके आले.
2. संख्याशास्त्रीय पद्धतीने t मूल्ये 0.99 इतके आले.
3. 0.01 सार्थकता स्तरावर df= 35 साठी कोष्टकावरुण t मूल्ये 2.72 इतके आहे.

0.01 सार्थकता स्तरावर परिकल्पना परीक्षण-

स्वाधीनता मात्रा 35 साठी टेबल D वरुन 0.01 सार्थकता स्तरावर मूल्य 2.72 आहे. प्राप्त t मूल्य 0.99 असून ते नमुना t मूल्यापेक्षा कमी असल्यामुळे प्राप्त मूल्य हे असार्थक मानावे लागेल. त्यामुळे शून्य परिकल्पनेचा स्विकार करावा लागेल व संशोधन परिकल्पनेचा त्याग करावा लागेल.

अर्थनिर्वचन:-

पूर्व चाचणी व उत्तर चाचणीच्या मध्यमानाच्या फरकाची सार्थकता तपासली असता प्राप्त t मूल्ये हे प्रमाणित t मूल्यापेक्षा कमी आले आहे. त्यामुळे शून्य परिकल्पनेचा स्विकार करावा लागेल व संशोधन परिकल्पनेचा त्याग करावा लागेल.

याचाच अर्थ, उच्च प्राथमिक स्तरावरील ग्रामीण क्षेत्र विद्यार्थी व शहरी क्षेत्र विद्यार्थी यांच्या आरोग्य समस्येत फारसा फरक आढळून येत नाही.

उद्दिष्ट क्र. 3 ची कार्यपद्धती-

उद्दिष्ट क्र. 03:- उच्च प्राथमिक विद्यालयातील ग्रामीण व शहरी भागातील मुले आणि ग्रामीण व शहरी भागातील मुली यांच्या आरोग्य समस्यांचा तुलनात्मक अभ्यास करणे.

Copyright@2024 Scholarly Research Journal for Humanity Science & English Language

कोष्टक क्रमांक- 3 मुले-मुली उत्तर अभिवृत्ती आरोग्य संपादणूक कसोटीतील प्राप्तांकाचा सांख्यिकिय तपशिल

अ. न.	चाचणी	नमुना (N)	मध्यमान (M)	प्रमाण विचलन (SD)	स्वाधीनता मात्रा (df)	t मूल्य	0.01 सार्थकता स्तरावर t मूल्य	प्राप्त t मूल्य सार्थक/ असार्थक	शून्य परिकल्पना स्विकार / त्याग
1	उत्तर	36	78	11	35	1.45	2.72	असार्थक	स्विकार
2	उत्तर	36	81	06					

निरीक्षणे:-

1. पूर्व चाचणीचे मध्यमान 78 व उत्तर चाचणीचे मध्यमान 81 इतके आले.
2. संख्याशास्त्रीय पद्धतीने t मूल्ये 1.45 इतके आले.
3. 0.01 सार्थकता स्तरावर df= 35 साठी कोष्टकावरुण t मूल्ये 2.72 इतके आहे.

0.01 सार्थकता स्तरावर परिकल्पना परीक्षण- स्वाधीनता मात्रा 35 साठी टेबल D वरुन 0.01 सार्थकता स्तरावर मूल्य 2.72 आहे. प्राप्त t मूल्य 1.45 असून ते नमुना t मूल्यापेक्षा कमी असल्यामुळे प्राप्त मूल्य हे असार्थक मानावे लागेल. त्यामुळे शून्य परिकल्पनेचा स्विकार करावा लागेल व संशोधन परिकल्पनेचा त्याग करावा लागेल.

अर्थनिर्वचन:-पूर्व चाचणी व उत्तर चाचणीच्या मध्यमानाच्या फरकाची सार्थकता तपासली असता प्राप्त t मूल्ये हे प्रमाणित t मूल्यापेक्षा कमी आले आहे. त्यामुळे शून्य परिकल्पनेचा स्विकार करावा लागेल व संशोधन परिकल्पनेचा त्याग करावा लागेल.

याचाच अर्थ, उच्च प्राथमिक स्तरावरील ग्रामीण व शहरी मुले आणि ग्रामीण व शहरी मुली यांच्या आरोग्य समस्येत फारसा फरक आढळून येत नाही.

उद्दिष्ट क्रमांक 1चे निष्कर्ष-

उद्दिष्ट क्रमांक 1- उद्बोधन कार्यक्रम अमंलबजावणी करणे व त्याची परिणामकारकता तपासणे.

Copyright@2024 Scholarly Research Journal for Humanity Science & English Language

उद्दिष्ट क्रमांक 1 चे निष्कर्ष खालील प्रमाणे आहेत.- उच्च प्राथमिक विद्यालयातील इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांना आरोग्य विषयक व्यवस्थापन कार्यक्रम राबविल्यानंतर खालील निष्कर्ष आढळले.

प्रमुख निष्कर्ष:-

1) उच्च प्राथमिक विद्यालयातील इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी आरोग्य विषयक व्यवस्थापन कार्यक्रम राबविणे गरजेचे आहे.
2) संशोधकाने विकसित केलेला आरोग्य व्यवस्थापन उद्बोधन कार्यक्रम हा विद्यार्थ्यांच्या आरोग्य समस्या जाणीव जागृतीसाठी परिणामकारक आहे.

सर्वसाधारण निष्कर्ष:-

1) विद्यार्थी शारीरिक आरोग्याचे महत्व जाणतो.
2) विद्यार्थी शारीरिक आरोग्याची काळजी घेतो.
3) विद्यार्थी भेसळयुक्त, रसायने युक्त अन्न टाळतो.
4) विद्यार्थी प्राण्याला व त्यापासून मानवाला आजार होणार नाही याची काळजी घेतो.
5) विद्यार्थी कार्यक्रम साजरे होताना पारंपारिक वाद्याचा वापर करतो.
6) विद्यार्थी खेळ, योगा व व्यायामाला अधिक महत्व देतो.
7) विद्यार्थी मानसिक आरोग्याचे महत्व जाणतो.
8) विद्यार्थी मानसिक आरोग्याची काळजी घेतो.
9) विद्यार्थी आडदांड वृत्ती, अंधश्रद्धा या पासून दूर राहतो.
10) विद्यार्थी लोभ, इर्षा, व्देश या पासून दूर राहतो.
11) विद्यार्थी सामाजिक व नैतिक आरोग्याचे महत्व जाणतो.
12) विद्यार्थी सामाजिक व नैतिक आरोग्याची काळजी घेतो.
13) विद्यार्थी सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता पाळतो.
14) विद्यार्थी सार्वजनिक कार्यात सहभाग नोंदवितो.
15) विद्याथी धार्मिक, जातीय, लिंगभेद करत नाही.
16) विद्यार्थी भूतदया धर्माचे पालन करतो.

उद्दिष्ट क्रमांक 2 चे निष्कर्ष-

उद्दिष्ट क्रमांक 2- उच्च प्राथमिक विद्यालयातील शहरी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या आरोग्य समस्यांचा तुलनात्मक अभ्यास करणे.

उद्दिष्ट क्रमांक 2 चे निष्कर्ष खालील प्रमाणे आहेत.- उच्च प्राथमिक विद्यालयातील शहरी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या आरोग्य समस्यांचा तुलनात्मक अभ्यास केला असता संशोधकास खालील निष्कर्ष आढळले.-

1) शहरी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या आरोग्य समस्यांमध्ये फारसा फरक आढळून येत नाही.

उद्दिष्ट क्रमांक 3 चे निष्कर्ष-

उद्दिष्ट क्रमांक 3- उच्च प्राथमिक विद्यालयातील ग्रामीण व शहरी भागातील मुले आणि ग्रामीण व शहरी भागातील मुली यांच्या आरोग्य समस्यांचा तुलनात्मक अभ्यास करणे.

उद्दिष्ट क्रमांक 3 चे निष्कर्ष खालील प्रमाणे आहेत.- उच्च प्राथमिक विद्यालयातील शहरी व ग्रामीण भागातील मुले व मुली यांच्या आरोग्य समस्यांचा तुलनात्मक अभ्यास केला असता संशोधकास खालील निष्कर्ष आढळले.-

1) शहरी व ग्रामीण भागातील मुले व मुली यांच्या आरोग्य समस्यांमध्ये फारसा फरक आढळून येत नाही.

निष्कर्षाची चर्चा:- प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष आणि पूर्व संशोधन निष्कर्ष यांचा परस्पर संबंध तपासण्यात आला. प्रस्तुत संशोधन निष्कर्ष आणि पूर्व संशोधन निष्कर्षांची चर्चा पुढीलप्रमाणे संशोधकाने केली,

1) उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना आरोग्य समस्या असल्याने आरोग्य साक्षरता उद्बोधन कार्यक्रम अंमलबजावणी करणे गरजेचे आहे.

2) **अनुराधा सहस्त्रबुद्धे (1987)** यांनी, "INTEGRATION OF HEALTH AND ADULT EDUCATION FOR WOMEN WITH A FOCUS ON TRANING ON FUNCTIONARIES" या विषयावर केलेल्या संशोधनात तिसादक जाणीव जागृती संख्या मध्यम स्वरुपात आढळली.   प्रस्तुत शोधनामध्ये आरोग्य समस्या जाणीव जागृती प्रमाण जास्त आढळले. म्हणजे सदर आरोग्य क्षरता उद्बोधन कार्यक्रम जास्त परिणामकारक आहे.

3) **Antony Peter Jude (2012)** यांनी, "AWARENESS OF HEALTH AND PHYSICAL FITNESS, STATUS OP PHYSICAL FITNESS, AND ACADEMIC ACHIEVEMENT AMONG SCHOOL BOYS AND GIRLS." या विषयावर केलेल्या संशोधनामध्ये आरोग्य विषयक जाणीव जागृतीचे प्रमाण कमी प्रमाणात आढळले. प्रस्तुत संशोधनामध्ये आरोग्य समस्या जाणीव जागृती प्रमाण जास्त आढळले. म्हणजे सदर आरोग्य साक्षरता उद्बोधन कार्यक्रम अधिक परिणामकारक आहे.

4) **हिरगळ जयश्री पंढरीनाथ (2008)** यांनी, "माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या आहार सवयींचा अभ्यास" या विषयावर केलेल्या संशोधनामध्ये प्रतिसादकांच्या आहार सवयीमध्ये अल्प प्रमाणात बदल आढळला. प्रस्तुत संशोधनामध्ये विद्यार्थी आहार सवयी मध्ये अधिक बदल झाला.

शिफारशी:- प्रस्तुत संशोधनाच्या आधारे संशोधकाने उच्च प्राथमिक विद्यालयाचे शिक्षक, पालक, मुख्याध्यापक यांचेसाठी खालील प्रमाणे शिफारशी केल्या.

I) प्रमुख शिफारशी-

1) उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यामध्ये आरोग्य साक्षरता व्यवस्थापनासाठी उद्बोधन कार्यक्रमामध्ये आरोग्यविषयक व्याख्याणे, ppt सादरीकरण, विविध उद्बोधन कार्यक्रम राबविणे व मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. (उद्दिष्ट क्रमांक 1)
2) उच्च प्राथमिक स्तरावरील ग्रामीण व शहरी विद्यार्थ्यामध्ये आरोग्य साक्षरता व्यवस्थापनासाठी उद्बोधन कार्यक्रमामध्ये विविध स्पर्धा, छंदवर्ग इत्यादी राबविणे आवश्यक आहे. (उद्दिष्ट क्रमांक 2 व 3)

II) शिक्षकांसाठी शिफारशी-

1) विद्यार्थी आरोग्य नोंदी नुसार विद्यार्थ्यांना आरोग्य मार्गदर्शन मिळावे.
2) शिक्षकांनी विद्यार्थ्यांना खेळ, योगा यांचेसाठी प्रोत्साहन द्यावे.
3) शाळेतील सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्याना भाग घेण्यासाठी प्रोत्साहन द्यावे.
4) शिक्षकांनी विद्यार्थ्यांबरोबर मिळून मिसळून वागावे.
5) शिक्षकांनी तणावमुक्त अध्यापनावर भर द्यावा. आनंददायी अध्यापन पद्धतीचा वापर करावा.
6) मोबाईल, पब्जी गेम पासून विद्यार्थ्यांना परावृत्त करावे.
7) विद्यार्थ्यामध्ये खिलाडू वृत्तीचा परिपोष करण्यासाठी प्रयत्न करावे.
8) विद्यार्थ्यामध्ये मूल्यांचा परिपोष होण्यासाठी प्रयत्नशिल राहावे.
9) विद्यार्थ्यांच्या नेतृत्व गुण विकसित होण्यासाठी संधी निर्माण करावी.
10) विद्यार्थ्यामध्ये पर्यावरणविषयक भावना जागृत करावी.

पुढील संशोधन अभ्यासासाठी विषय:-

1) निम्न प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना आरोग्य साक्षरता व्यवस्थापनासाठी उद्बोधन कार्यक्रम निर्मिती व परिणामकारकता.
2) माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना आरोग्य साक्षरता व्यवस्थापनासाठी उद्बोधन कार्यक्रम निर्मिती व परिणामकारकता.
3) उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना आरोग्य साक्षरता व्यवस्थापनासाठी उद्बोधन कार्यक्रम निर्मिती व परिणामकारकता.

4) अध्यापक विद्यालयातील विद्यार्थ्यांना आरोग्य साक्षरता व्यवस्थापनासाठी उद्बोधन कार्यक्रम निर्मिती व परिणामकारकता.
5) आंगणवाडी सेविकांच्या आरोग्य साक्षरता व्यवस्थापनासाठी उद्बोधन कार्यक्रम निर्मिती व परिणामकारकता.
6) शिक्षकांच्या मानसिक ताणतणाव व्यवस्थापनासाठी वि उद्बोधन कार्यक्रम निर्मिती व परिणामकारकता.
7) मुख्याध्यापकांच्या मानसिक ताणतणाव व्यवस्थापनासाठी वि उद्बोधन कार्यक्रम निर्मिती व परिणामकारकता.

प्रस्तुत संशोधन विषयाचे योगदान:-

1) प्रस्तुत संशोधनातून उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना आरोग्य साक्षरता जाणीव जागृती होण्यास मदत होणार आहे.
2) विद्यार्थ्यांना आरोग्य चांगले राखण्यासाठी मदत होणार आहे.
3) पालक, शिक्षक, मुख्याध्यापक यांना या संशोधनाचा फायदा होणार आहे.
4) आरोग्य समस्या निर्मूलन ही सामाजिक जबाबदारी असल्याने या संशोधनाचा शासकीय स्तरावर विविध आरोग्य उपक्रम राबविण्यासाठी उपयोग होणार आहे.

सारांश:-

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधकाने उच्च प्राथमिक विद्यालयातील इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यामध्ये आसणाऱ्या आरोग्य समस्यांचा व्यवस्थापनासाठी निर्माण केलेल्या उद्बोधन कार्यक्रमाची अंमलबजावणी केली. संख्याशास्त्रीय विश्लेषणाच्या आधारे उद्बोधन कार्यक्रमाची परिणामकारकता ठरविली.

संदर्भसूची

*आलेगावकर, प. म., (सप्टेंबर-2005) **अध्ययन अध्यापनाचे मानसशास्त्र**, पुणेः सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे.*

*कदम, चा.प. (2007) **शैक्षणिक संख्याशास्त्र**, पुणेः नित्यनूतन प्रकाशन.*

*किर्दात, एस. बी. (2005), **पर्यावरण जाणीवजागृती**, पुणे, निराली प्रकाशन.*

*चिकोडे, रणजित., (2016) **योगाभ्यासने**, कोल्हापूर: रिया पब्लिकेशन.*

*जगताप, ह.ना. (नोव्हे. 2005) **प्रगत शैक्षणिक तंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञान**, पुणेः नित्यनूतन प्रकाशन.*

Copyright@2024 Scholarly Research Journal for Humanity Science & English Language

देसले, एस., भदाणे, एम.ए., (2008) ***शैक्षणिक मूल्यमापन व संख्याशास्त्र****, नाशिकः रेशमाई पब्लिकेशन.*

देशपांडे, व. सी., महाले, एस. आर. (2008) ***अध्यापन आणि अध्यापक शिक्षण संशोधनाच्या दिशा****, नाशिक प्रशिक्षण प्रकाशन.*

दांडेकर, वा. ना. (2004) ***शैक्षणिक मूल्यमापन व संख्याशास्त्र****, पुणेः श्री विद्या प्रकाशन पुणे.*

पाठक, दत्तकुमार, राजेश्वर, बेंबडे, (2018) ***औषधी वनस्पती उपचार****, लातूरः विद्याभारती प्रकाशन.*

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व संशोधन मंडळ, ***पर्यावरण शिक्षण व जलसुरक्षा****, (प्रथम आवृत्ती) – इयत्ता बारावी, (2020), पुणे.*

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व संशोधन मंडळ, ***पर्यावरण शिक्षण****, (प्रथम आवृत्ती) – इयत्ता बारावी, (2019), पुणे.*

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व संशोधन मंडळ, ***सामान्य विज्ञान*** *(प्रथम आवृत्ती) – इयत्ता सहावी, (2016), पुणे.*

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व संशोधन मंडळ, ***सामान्य विज्ञान*** *(प्रथम आवृत्ती) – इयत्ता सहावी, (2017), पुणे.*

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व संशोधन मंडळ, ***सामान्य विज्ञान*** *(प्रथम आवृत्ती) – इयत्ता सातवी, (2017), पुणे.*

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व संशोधन मंडळ, ***भूगोल*** *(प्रथम आवृत्ती) – इयत्ता सातवी, (2017), पुणे.*

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व संशोधन मंडळ, ***सामान्य विज्ञान*** *(प्रथम आवृत्ती) – इयत्ता आठवी, (2019), पुणे.*

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व संशोधन मंडळ, ***भूगोल*** *(प्रथम आवृत्ती) – इयत्ता सातवी, (2019), पुणे.*

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व संशोधन मंडळ, ***जीवन शिक्षण*** *(जुलै 2010), (2010), पुणे.*

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व संशोधन मंडळ, ***जीवन शिक्षण*** *(ऑक्टोबर 2011), (2011), पुणे.*

महाले, सं. (2003) ***संशोधनात सांख्यिकी तंत्राचे उपयोजनः प्रात्यक्षिक पुस्तिका****, नाशिकः य.च.म.मु.विद्यापीठ, नाशिक.*

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, (2001) ***SOC223, भारतीय समाज****, नाश्कि.*

Buch, M. B.,(1978-1983), ***Tests and Measurement****, A Trend Report: Kulkarni S.S., Kuldeep Kumar, Abstracts (659-741).*

Buch, M. B.,(1983-1988), ***Research in Tests and Measurement****, A Trend Report: Kuldeep Kumar, Abstracts (613-646).*

Copyright@2024 Scholarly Research Journal for Humanity Science & English Language

Cite Your Article as:

Shri. Patole Uttam Mahadu & Dr. Sandhya Milind Khedkar. (2024). UCHHA PRATHMIK VIDYALAYATIL VIDHYARTHYANCHYA AROGY SAMASYANCHA VYAVASTHAPANASATHI UDBODHAN KARYAKRAMACHI AMALBAJAVANI V PARINAMKARAKTA. In Scholarly Research Journal for Interdisciplinary studies (Vol. 12, Number 81, pp. 210–224). Zenodo. https://doi.org/10.5281/zenodo.10784788

Copyright@2024 Scholarly Research Journal for Humanity Science & English Language